# नियमित दिवाणी वाद क्र.२९७/२०१८
# (रामदास आटकळे विरुध्द यशवंत आटकळे व इतर)
# <u>निशाणी क्र.१४ कडील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६, नियम ९ नुसार न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक होण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा दावा मौजे शेगाव दुमाला ता. पंढरपूर येथील जमीन गट नं.२६९ क्षेत्र १ हेक्टर ६३ आर, गट नं.२७०/अ क्षेत्र ३८ आर आणि २७० क्षेत्र १ हेक्टर ५६ आर या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीच्या कब्जे वहीवाटीस अडथळा, हस्तक्षेप करु नये म्हणून दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी क.१२ कडे कैफियत दाखल करुन दाव्यातील सर्व कथने नाकरली आहेत. निशाणी क्र. १५ कडे प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन गट क्र.२६९ आणि २७० या गटांमधील उपगटांची मोजणी सुध्दा होणे आवश्यक आहे, अशी हरकत नोंदवली आहे. तसेच अर्ज कबुल नसल्याचे कथन केले आहे. वादीतर्फे विद्वान वकील श्री.पी.व्ही.चवरे आणि प्रतिवादीतर्फे श्री.बी.डी.भोसले यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा जरी कायमस्वरुपी मनाई हुकुमासाठी असला, तरी प्रतिवादी यांनी गट क्र.२६९ आणि २७० यांच्यामध्ये सर्व गटांची मोजणी होण्याची मागणी केली आहे. त्यामुळे न्यायालयीन आयुक्तांची नेमणूक करण्यामध्ये कोणतीही बाधा उत्पन्न होत नाही. परंतू, वादी आणि प्रतिवादी यांचयातील वाद संपुष्टात येण्यासाठी न्यायलयीन आयुक्तांची नेमणूक होऊन, संपुर्ण गट क्र.२६९, २७० आणि प्रतिवादी यांचा गट क्र.२६८ यांची मोजणी होऊन हद्दी– खुणा कायम होणे आवश्यक आहे, करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो–

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. याद्वारे न्यायालयीन आयुक्त–उप अधीक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर यांना मौजे शेगाव दुमाला, ता. पंढरपूर, येथील जमीन गट क्र. २६९, २७० आणि २६८ या गटांची व त्यातील उपगटांची मोजणी करुन, हद्दीखुणा दाखवून, मोजणी अहवाल नकाशासह दिनांक १६.०२.२०१९ पर्यंत सादर करावा असे निर्देशित करण्यात येते. सदर मोजणीच्या अगोदर वादी, प्रतिवादी आणि इतर लगतच्या शेत शेजारी यांना मोजणीबाबतच्या नोटीसा द्याव्यात.

३. वादींनी मोजणीसाठी आवश्यक असणारी मोजणी फी तालुका भूमी अभिलेख कार्यालयामध्ये दिनांक ०२.०२.२०१९ पर्यंत भरावी. तसेच मोजणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करावीत.

४. न्यायालयीन आयुक्तांनी मोजणी अहवाल नकाशासह, दि.१६.०२.२०१९ पर्यंत सादर करावा.

५. वादी व प्रतिवादी यांनी न्यायालयीन आयुक्तांसमोर येणेप्रमाणे उपस्थित राहावे.

६. येणेप्रमाणे कमिशन पत्र जारी करणेत यावे.

दिनांक ०३.०१.२०१९

(एस.जी.सरोदे)
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर